# महाराष्ट्र शासन
## राज्य पेसा कक्ष, पुणे
**(ग्राम विकास व पंचायतराज विभाग)**

यशवंतराव चव्हाण भवन, जिल्हा परिषद (जुनी इमारत)चौथा मजला, १ वेलस्ली रोड, कँप, पुणे-४११ ००१
दुरध्वनी क्रमांक : ०२०-२९९७०१०० , ई-मेल – pesamaharashtra@gmail.com


---

जा.क्र./पेसा/आस्था/२८२/२०२४-२५ दि. ११ फेब्रुवारी, २०२५

**प्रति,**

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, पुणे, ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहिल्यानगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली**

**विषय -: जिल्हा व्यवस्थापक (पेसा) व तालुका व्यवस्थापक (पेसा) या पदाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये**

महोदय,

**पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६** (पेसा कायदा) व **अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५% थेट निधी योजना** यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य पेसा कक्षामार्फत जिल्हा व्यवस्थापक (पेसा) व तालुका व्यवस्थापक (पेसा) या पदांवर बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

राज्य पेसा कक्षांतर्गत कार्यरत जिल्हा व्यवस्थापक (पेसा) व तालुका व्यवस्थापक (पेसा) या पदांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ व ब** नुसार राहतील. तरी आपल्या स्तरावरून सबंधीत जिल्हा व्यवस्थापक (पेसा) व तालुका व्यवस्थापक (पेसा) यांना त्यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये निदर्शनास आणावीत ही विनंती.

**सोबत :- परिशिष्ट अ व ब**

**आपला,**

Sawant

**(शेखर शं. सावंत)**
**संचालक, राज्य (पेसा)**

प्रत :-

१) मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर
२) मा. उपायुक्त (विकास) तथा नोडल अधिकारी (पेसा), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) तथा नोडल अधिकारी (पेसा), जिल्हा परिषद पुणे, ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहिल्यानगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली

## परिशिष्ट-अ

## जिल्हा व्यवस्थापक (पेसा) या पदाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये

१) पंचायतीसंबधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ व नियम, २०१४ ची जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रामध्ये ग्रामपंचायती व ग्रामसभांद्वारे प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी पाठपुरावा करून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) तथा नोडल अधिकारी (पेसा) यांना यासाठी सहाय्य करणे.

२) जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्र व पेसा क्षेत्राची तसेच पेसा अधिनियम व नियमांच्या अंमलबजावणीची माहिती संकलित करणे व नेहमी अद्ययावत ठेवणे.

३) पेसा कायदा अंमलबजावणीबाबत प्राप्त तक्रारी/निवेदनांवर उचित कार्यवाही होण्यासाठी संबंधीतांना योग्य मार्गदर्शन व सहाय्य करणे.

४) जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रामध्ये पेसा अधिनियम व नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत येणाऱ्या अडचणी/समस्या/प्रश्न इत्यादींचा अभ्यास करून जिल्हा परिषद व वरिष्ठ कार्यालयास अहवाल सादर करणे व त्याचा पाठपुरावा करणे.

५) पेसा अधिनियम व नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राबविण्यात येणारी प्रशिक्षणे/माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम तसेच अन्य क्षमता बांधणीचे उपक्रम पेसा कायद्याशी सुसंगत होण्यासाठी संबंधीत यंत्रणांना आवश्यकतेनुसार उचित मार्गदर्शन करणे.

६) पेसा अधिनियम व नियमांच्या प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायती, जिल्ह्यातील विविध शासकीय व अशासकीय कार्यालये, संस्था, संघटना, प्रसार माध्यमे यांचेसोबत समन्वय साधून आवश्यकतेनुसार त्यांना कायद्याशी सुसंगत मार्गदर्शन करणे.

७) पेसा अधिनियम व नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध प्रश्नांबाबत नोडल अधिकारी (पेसा) यांचेमार्फत आवश्यकतेनुसार राज्य पेसा कक्षाचे मार्गदर्शन घेवून कामकाज करणे.

८) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेची जिल्ह्याच्या अनुसूचित क्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.

९) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेचा शासनाकडून प्राप्त निधी संबंधीत ग्रामपंचायतींना/ग्रामसभा कोषांना विहित मुदतीत वितरीत करणे.

१०) संबंधीत ग्रामपंचायतींना /ग्रामसभा कोषांना ५% थेट निधी वितरीत केल्यानंतर निधीचा विनियोग विहित मुदतीत होण्यासाठी योजनेचे नियमित सनियंत्रण करणे.

११) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेच्या अंमलबजावणीचा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) तथा नोडल अधिकारी (पेसा) यांचेमार्फत नियमित आढावा घेणे.

१२) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेचे पंचायत समिती निहाय मासिक, त्रैमासिक व वार्षिक अहवाल संकलित करणे व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) तथा नोडल अधिकारी (पेसा) यांचेमार्फत वरिष्ठ कार्यालयास विहित मुदतीत सादर करणे.

१३) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण करण्यासाठी जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना व पेसा गावांना नियमितपणे भेटी देवून योजनेमार्फत राबविण्यात आलेल्या कामांची पाहणी करणे व भेटीचा अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) तथा नोडल अधिकारी (पेसा) यांचेमार्फत राज्य पेसा कक्षास सादर करणे.

१४) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या व पेसा गावांच्या भेटी दरम्यान पेसा अधिनियम व ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेबाबत अभिलेखांची/दस्तावेजांची तपासणी करणे व संबंधीतांकडून त्रूटींची पूर्तता करून विविध रजिस्टर्स, अभिलेख, दस्तावेज व लेखे अद्ययावत करून घेणे.

१५) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेबाबत अभिलेखांची/दस्तावेजांची तपासणी करताना आढळून आलेल्या गंभीर स्वरूपाच्या त्रूटींचा/बाबींचा अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) तथा नोडल अधिकारी (पेसा) यांचेमार्फत राज्य पेसा कक्षास सादर करणे.

१६) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नाविण्यपूर्ण उपक्रम, उपजीविका व ग्रामपंचायतींच्या उत्पन्न वाढीचे उपक्रम सूचविणे व ते राबविणेसाठी पंचायतींना/गावांना प्रवृत्त करणे.

१७) अनुसूचित क्षेत्रात (पेसा) विविध योजनांचे लाभ पोहोचण्यासाठी विविध योजनांची ५% थेट निधी योजनेशी सांगड घालून योजनेचा उत्कृष्ठपणे कृतीसंगम साधण्यासाठी प्रयत्न करणे.

१८) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेचा समावेश ग्रामपंचायत विकास आराखड्यात करून योजनेचे वार्षिक व पंचवार्षिक आराखडे अद्ययावत ठेवणे व मंजूर आराखड्यांची निधीच्या उपलब्धतेनुसार प्रभावीपणे अंमलबजावणी संबंधीतांकडून करून घेणे.

१९) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेच्या वार्षिक आराखड्यांच्या छाननीसाठी तालुकास्तरीय तांत्रिक छाननी समितीला मार्गदर्शन करणे.

२०) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेच्या वार्षिक आराखड्यांचे बदल प्रस्ताव जिल्हा परिषदेला प्राप्त झाल्यास त्यावर विहित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणे.

२१) अनुसूचित क्षेत्रात पेसा अधिनियम व नियमांची प्रभावी अंमलबजावणी, ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजना, नाविण्यपूर्ण विविध उपक्रम, इत्यादींबाबत विविध यशोगाथा संकलित करून आवश्यकतेनुसार जिल्हा स्तरावरून मोफत व व्यापक प्रसिध्दी देणे.

२२) तालुका व्यवस्थापक (पेसा) यांच्या कामकाजाचा नियमित आढावा घेवून त्यांना कामकाजासाठी वेळोवेळी आवश्यक ते सहाय्य व मार्गदर्शन करणे.

२३) जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रामध्ये पेसा अधिनियम व ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संचालक, राज्य (पेसा), उपायुक्त (विकास) तथा नोडल अधिकारी (पेसा), विभागीय आयुक्त कार्यालय, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) तथा नोडल अधिकारी (पेसा) व राज्य पेसा समन्वयक यांचे मार्गदर्शनाखाली कामकाज करणे व वेळोवेळी सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे.

## परिशिष्ट-ब

## तालुका व्यवस्थापक (पेसा) या पदाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये

१) पंचायतीसंबधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ व नियम, २०१४ ची तालुक्यातील अनुसूचित क्षेत्रामध्ये ग्रामपंचायती व ग्रामसभांद्वारे प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी पाठपुरावा करून गट विकास अधिकारी यांना यासाठी सहाय्य करणे.

२) तालुक्यातील अनुसूचित क्षेत्र व पेसा क्षेत्राची तसेच पेसा अधिनियम व नियमांच्या अंमलबजावणीची माहिती संकलित करणे व नेहमी अद्ययावत ठेवणे.

३) पेसा कायदा अंमलबजावणीबाबत प्राप्त तक्रारी/निवेदनांवर उचित कार्यवाही होण्यासाठी संबंधीतांना योग्य मार्गदर्शन व सहाय्य करणे.

४) तालुक्यातील अनुसूचित क्षेत्रामध्ये पेसा अधिनियम व नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत येणाऱ्या अडचणी/समस्या/प्रश्न इत्यादींचा अभ्यास करून पंचायत समिती व वरिष्ठ कार्यालयास अहवाल सादर करणे व त्याचा पाठपुरावा करणे.

५) तालुक्यातील अनुसूचित क्षेत्रामध्ये पेसा अधिनियम व नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राबविण्यात येणारी प्रशिक्षणे/माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम तसेच अन्य क्षमता बांधणीचे उपक्रम पेसा कायद्याशी सुसंगत होण्यासाठी संबंधीत यंत्रणांना आवश्यकतेनुसार उचित मार्गदर्शन करणे.

६) पेसा अधिनियम व नियमांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी पंचायत समिती व ग्रामपंचायती, विविध शासकीय व अशासकीय कार्यालये, संस्था, संघटना, प्रसार माध्यमे यांचेसोबत समन्वय साधून आवश्यकतेनुसार त्यांना कायद्याशी सुसंगत मार्गदर्शन करणे.

७) पेसा अधिनियम व नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुक्यातील विविध प्रश्नांबाबत गट विकास अधिकारी यांचे मार्गदर्शन घेवून कामकाज करणे.

८) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेची तालुक्याच्या अनुसूचित क्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.

९) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेचा शासनाकडून प्राप्त निधी संबंधीत ग्रामपंचायतींना/ग्रामसभा कोषांना विहित मुदतीत वितरीत करणे.

१०) संबंधीत ग्रामपंचायतींना/ग्रामसभा कोषांना ५% थेट निधी वितरीत केल्यानंतर निधीचा विनियोग विहित मुदतीत होण्यासाठी योजनेचे नियमित सनियंत्रण करणे.

११) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेच्या अंमलबजावणीचा गट विकास अधिकारी यांचेमार्फत नियमित आढावा घेणे.

१२) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेचे ग्रामपंचायत निहाय मासिक, त्रैमासिक व वार्षिक अहवाल संकलित करणे व गट विकास अधिकारी यांचेमार्फत वरिष्ठ कार्यालयास विहित मुदतीत सादर करणे.

१३) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण करण्यासाठी तालुक्यातील ग्रामपंचायती व पेसा गावांना नियमितपणे भेटी देवून

योजनेमार्फत राबविण्यात आलेल्या कामांची पाहणी करणे व भेटीचा अहवाल गट विकास अधिकारी यांचेमार्फत वरिष्ठ कार्यालयांस सादर करणे.

१४) तालुक्यातील ग्रामपंचायती व पेसा गावांच्या भेटी दरम्यान पेसा अधिनियम व ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेबाबत अभिलेखांची/दस्तावेजांची तपासणी करणे व संबंधीतांकडून त्रूटींची पूर्तता करून विविध रजिस्टर्स, अभिलेख, दस्तावेज व लेखे अद्ययावत करून घेणे.

१५) ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेबाबत अभिलेखांची/दस्तावेजांची तपासणी करताना आढळून आलेल्या गंभीर स्वरूपाच्या त्रूटींचा/बाबींचा अहवाल गट विकास अधिकारी यांचेमार्फत वरिष्ठ कार्यालयांस सादर करणे.

१६) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नाविण्यपूर्ण उपक्रम, उपजीविका व ग्रामपंचायतींच्या उत्पन्न वाढीचे उपक्रम सूचविणे व ते राबविणेसाठी पंचायतींना/ पेसा गावांना प्रवृत्त करणे.

१७) अनुसूचित क्षेत्रात (पेसा) विविध योजनांचे लाभ पोहोचण्यासाठी विविध योजनांची ५% थेट निधी योजनेशी सांगड घालून योजनेचा उत्कृष्ठपणे कृतीसंगम साधण्यासाठी प्रयत्न करणे.

१८) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेचा समावेश ग्रामपंचायत विकास आराखड्यात करून योजनेचे वार्षिक व पंचवार्षिक आराखडे अद्ययावत ठेवणे व मंजूर आराखड्यांची निधीच्या उपलब्धतेनुसार प्रभावीपणे अंमलबजावणी संबंधीतांकडून करून घेणे.

१९) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेच्या वार्षिक आराखड्यांची छाननी करण्यासाठी तालुकास्तरीय तांत्रिक छानणी समितीला मार्गदर्शन करणे.

२०) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेच्या वार्षिक आराखड्यांचे बदल प्रस्ताव पंचायत समितीस प्राप्त झाल्यास त्यावर विहित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणे.

२१) अनुसूचित क्षेत्रात पेसा अधिनियम व नियमांची प्रभावी अंमलबजावणी, ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजना, नाविण्यपूर्ण विविध उपक्रम, इत्यादींबाबत विविध यशोगाथा संकलित करून आवश्यकतेनुसार जिल्हा/तालुका स्तरावरून मोफत व व्यापक प्रसिध्दी देणे.

२२) तालुक्यातील अनुसूचित क्षेत्रामध्ये पेसा अधिनियम व ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संचालक, राज्य (पेसा), उपायुक्त (विकास) तथा नोडल अधिकारी (पेसा), विभागीय आयुक्त कार्यालय, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) तथा नोडल अधिकारी (पेसा), गट विकास अधिकारी, राज्य पेसा समन्वयक व जिल्हा व्यवस्थापक (पेसा) यांचे मार्गदर्शनाखाली कामकाज करणे व वेळोवेळी सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे.

****************************************************************************************************